# छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे

## डॉ. पंजाबराव देशमुख सारथी उच्च शिक्षण देशांतर्गत शिष्यवृत्ती योजना २०२२

## अटी व शर्ती

**ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी खालील प्रमाणे नमूद महत्वाच्या बाबी निर्देशनास आणून देण्यात येत असून उमेदवारांनी अर्ज करण्यापूर्वी दक्षता घ्यावी व पात्रता असल्यास अर्ज करावा.**

१. या योजनेअंतर्गत शिष्यवृत्तीच्या लाभासाठी विद्यार्थी महाराष्ट्र राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी -मराठा या जातीतील असावा .

२. महाराष्ट्र राज्यातील रहिवाशी असावा.

३. विद्यार्थ्यांने पदवी अभ्यासक्रमासाठी अर्ज करताना पदवीसाठी राज्य शासनाच्या किंवा इतर राज्याच्या/केंद्र शासनाच्या कोणत्याही शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेला नसावा. तसेच पदव्युत्तर पदवी/ पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी अर्ज करताना पदव्युत्तर पदवी/ पदवीत्तोर पदविकासाठी राज्य शासनाच्या किंवा इतर राज्याच्या/केंद्र शासनाच्या शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेला नसावा.

४. या शिष्यवृत्तीसाठी विहीत केलेल्या विद्यापीठ/संस्थांमध्ये प्रवेश घेणारा विद्यार्थी हा पुर्णवेळ विद्यार्थी म्हणून प्रवेशित असावा.

५. पदवी अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांची कमाल वयोमर्यादा **२५ वर्षे** व पदव्युत्तर पदवी / पदविका अभ्यासक्रमासाठी कमाल वयोमर्यादा **३० वर्षे** इतकी राहील.

६. उपरोक्त ३०० पात्र शिष्यवृत्तीधारक विद्यार्थीपैकी ५०% जागा मुली / विद्यार्थीनी करिता राखीव असतील.

७. या योजनेअंतर्गत शिष्यवृत्तीच्या लाभासाठी विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे सर्व मार्गांनी मिळणारे एकुण वार्षिक उत्पन्न हे नॉन क्रिमी लेयर मधील असणे ₹ ८.०० आवश्यक आहे. एकुण दरवर्षी ३०० विद्यार्थ्योची निवड या शिष्यवृत्ती करिता करण्यात येईल. पालक / विद्यार्थी यांचे एक रक्कमी वार्षीक उत्पन्नानुसार शिष्यवृत्ती देय विद्यार्थी संख्या बाबतची माहीती खालील रकाना मध्ये दर्शविण्यात आली आहे.

| अ.क्र. | सन २०२२-२३ | एकुण दरवर्षी शिष्यवृत्ती विद्यार्थी देय संख्या | उत्पन्न मर्यादा व देय लाभ विद्यार्थी संख्या | |
|---|---|---|---|---|
| १ | | ३०० | ० ते ३ लाख पर्यंत | १०० |
| २ | | | ३ ते ५ लाख पर्यंत | १०० |
| ३ | | | ५ ते Non creamy layer मर्यादे पर्यंत | १०० |

उपरोक्त नमुद पात्र विद्यार्थी जर त्यावर्षी उपलब्ध झाले नाही तर व्यवस्थापकीय संचालक सारथी हे वरिल रकानामध्ये दर्शविण्यात आलेले उत्पन्न मर्यादा मधील विद्यार्थ्यांच्या संख्ये मध्ये त्या वर्षी पुरते बदल करूण पात्र विद्यार्थ्यां मधुन रिक्त जागा भरण्यात येतील .उदा.३ लखा वार्षीक उत्पन्न मर्यादा असलेले पात्र विद्यार्थी संख्या कमी असल्यास सदर रिक्त जागा व रकाना क्रमांक २ मध्ये दर्शविण्यात आलेल्या उत्पन्न मर्यादा ३ ते ५ लाख या मधुन पात्र लभार्थ्यांची निवड करेल व त्या उत्पन्न मर्यादेचे पात्र लाभार्भी पुरेसे उपलब्ध न झाल्यास रकाना क्रमांक ३ मध्ये दर्शविण्यात आलेल्या उत्पन्न मर्यादा ५ ते ८ लाख मधुन करण्यात येतील. यामध्ये मर्यादेच्या प्रमाणत अतंर्गत रिक्त जागा भरण्याचे व बदलण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक सारथी यांना राहतील.

८. विद्यार्थ्यांचे पालक नोकरीत असतील तर त्यांचे आयकर विवरणपत्र, फॉर्म नं.१६ व सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले मागील अर्थिक वर्षाचे कुटुंबाचे सर्व मार्गांनी मिळणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

९. जर पात्रधारक ५० विद्यार्थीनी मुली उपलब्ध झाल्या नाही तर त्या वर्षा करिता पात्र विद्यार्थी मुलांमधुन त्या भरण्यात येतील व सदर अधिकार हे व्यवस्थापकीय संचालक सारथी यांचे राहतील.

१०. इतर विद्यार्थ्यांसाठी सक्षम प्राधिकारी (तहसिलदार किंवा नायब तहसिलदार) यांनी दिलेले मागील अर्थिक वर्षाचे कुटुंबाचे सर्व मार्गांनी मिळणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**११. शैक्षणिक अर्हता खालील प्रमाणे आवश्यक :**

(अ) या योजनेंतर्गत शिष्यवृत्तीच्या लाभासाठी विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य विभागीय माध्यमिक व उच्च माध्यमिक परिक्षा मंडळ अथवा महाराष्ट्र राज्य क्षेत्रातील अन्य परिक्षा मंडळातून इयत्ता १० वी व १२ वी ची परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

(आ) या योजनेंतर्गत पदवी अभ्यासक्रमाच्या शिष्यवृत्तीच्या लाभासाठी विद्यार्थ्यांचे इयत्ता १२ वी च्या परीक्षेतील गुण विचारात घेऊन गुणानुक्रमे निवड करण्यात येईल. त्याकरीता विद्यार्थ्यांने इयत्ता १२ वी च्या परीक्षेत किमान ५५ टक्के गुण मिळविणे आवश्यक राहील.

(इ) तसेच, पदवी अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षात प्रवेश घेणाऱ्या डिप्लोमा धारक विद्यार्थ्यांचे डिप्लोमाच्या परिक्षेतील गुण विचारात घेऊन गुणानुक्रमे निवड करण्यात येईल. त्याकरिता विद्यार्थ्याने डिप्लोमाच्या परिक्षेत किमान ५५ टक्के गुण मिळविणे आवश्यक राहिल.

(ई) पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या शिष्यवृत्तीकरीता पदवी अभ्यासक्रमातील गुणांची टक्केवारी विचारात घेऊन गुणानुक्रमे निवड करण्यात येईल. त्याकरीता विद्यार्थ्यांने पदवी परीक्षेमध्ये किमान ५५ टक्के गुण (संपूर्ण अभ्यासक्रम कालावधीतील सर्व सत्रांच्या एकूण प्राप्त गुणांची टक्केवारी) मिळविणे आवश्यक राहील. तसेच, CGPA व GPA च्या बाबतीत संबंधित विद्यापीठाचे टक्केवारी रुपांतरण प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

(उ) संबंधित अर्जदार विद्यार्थी हा या योजनेअंतर्गत विहीत केलेल्या संस्थांमध्ये पदवी/ पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका या अभ्यासक्रमांसाठी त्या त्या संस्थांची प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होऊन प्रवेशित झालेला असावा.

**१२.** राज्यातील सर्व विभागातील विद्यार्थ्यांना समान संधी देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र राज्य विभागीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण परिक्षा मंडळाच्या परिक्षेत्रातील रहिवासी असलेल्या विद्यार्थ्यांची खालीलप्रमाणे मंडळनिहाय निवड करण्यात येईल.

| अभ्यासक्रमांसाठी मंडळनिहाय आरक्षण खालीलप्रमाणे असेल:- अ.क्र. | अभ्यासक्रम स्तर | | | विभागीय शिक्षण परिक्षा मंडळ निहाय (प्रत्येक विद्यार्थी) | एकूण विद्यार्थी (९ मंडळे) |
|---|---|---|---|---|---|
| १. | पदवी | अ) | इ.१२वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी | २४ | २१६ |
| | | ब) | डिप्लोमा धारक विद्यार्थ्यांसाठी | ३ | २७ |
| २. | पदव्युत्तर पदवी / पदव्युत्तर पदविका | | | ६ | ५४ |
| ३. | पदव्युत्तर पदवी / पदविका (राज्यस्तर) | | | -- | ३ |
| | एकूण | | | | ३00 |

**टीप :**

(१) ३०० विद्यार्थी संख्येच्या मर्यादेच्या अधिन राहून एखाद्या परिक्षा मंडळामध्ये कमी विद्यार्थी पात्र ठरल्यास दुसऱ्या मंडळातील विद्यार्थ्यांची गुणानुक्रमानुसार अंतर्गत परिवर्तनाने बदल करुन निवड करण्याचे अधिकार निवड समितीस राहतील.

(२) इतर परिक्षा मंडळाच्या परिक्षा उत्तीर्ण होणाऱ्या अर्जदारांचा विचार हा तो ज्या जिल्ह्यातून परिक्षा उत्तीर्ण झाला असेल त्या जिल्ह्यासाठीच्या विभागीय शिक्षण मंडळांतर्गत करण्यात यावा. यासाठी संबंधित विद्यार्थ्यांनी शाळा / महाविद्यालय सोडल्याचा दाखला विचारात घेण्यात येईल.

## १३.या शिष्यवृत्ती अंतर्गत विद्यार्थ्यांना मिळणारे लाभ खालील प्रमाणे असतील :-

(अ) डॉ. पंजाबराव देशमुख सारथी उच्च शिक्षण देशांतर्गत गुणवत्ता शिष्यवृत्तीसाठी पात्र झालेल्या विद्यार्थ्यास संबंधित विद्यापीठ/ शैक्षणिक संस्थेने अभ्यासक्रमासाठी ठरवून दिलेले पूर्ण शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, नोंदणी फी, जिमखाना, ग्रंथालय, संगणक इत्यादी शुल्क संबंधित विद्यापीठ/ शैक्षणिक संस्थेमार्फत संबंधित विद्यार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यात येईल. संबंधित विद्यार्थ्याने विद्यापीठ / शैक्षणिक संस्थेला शुल्क अदा केल्याचे पुरावे सारथी सस्थेस सादर करणे आवश्यक राहील.

(आ) संबंधित विद्यापीठ/ शैक्षणिक संस्थेच्या वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना संस्थेने आकारणी केलेले शुल्क तसेच, भोजन शुल्काची सत्रनिहाय रक्कम संबंधित विद्यार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यास पात्र असतील.

(इ) जे विद्यार्थी वसतिगृहात जागेअभावी अन्यत्र राहात असतील अशा विद्यार्थ्यांना वसतिगृह शुल्क व भोजन शुल्काची रक्कम ही तो शिक्षण घेत असलेल्या संबंधित संस्थेच्या आकारणी करण्यात

येत असलेल्या (वसतिगृह शुल्क व भोजन शुल्क) रक्कमेच्या मर्यादेत सत्रनिहाय रक्कम संबंधित विद्यार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यावर जमा करण्यास पात्र असतील.

(ई) योजनेअंतर्गत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांस अभ्यासक्रमासाठी लागणाऱ्या पुस्तकांसाठी ₹ २५,०००/- व शैक्षणिक साहित्य तसेच, इतर शैक्षणिक खर्च यासाठी एकूण ₹ २५,000/- अशी एकूण ₹ ५०,०००/- प्रत्येक वर्षी संबंधित विद्यार्थ्यास त्याच्या आधार संलग्न बँक खात्यावर दोन टप्प्यात अदा करण्यात येईल. यासाठीचा तपशिल संबंधित शैक्षणिक संस्थेमार्फत विहित नमुन्यात सारथी कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक असेल.

## १४.इतर अटी-शर्ती खालीलप्रमाणे असतील :-

(१) महाराष्ट्र राज्य विभागीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण परिक्षा मंडळाच्या विभागीय मंडळाच्या एखाद्या परिक्षेत्रातून संबंधित शैक्षणिक वर्षामध्ये विहित विद्यार्थी संख्या उपलब्ध झाली नाही तर अन्य विभागीय परिक्षा मंडळातून तेवढ्या संख्येच्या विद्यार्थ्यांची गुणवत्तेनुसार शिष्यवृत्तीसाठी निवड करण्यात येईल.

(२) संबंधित निवड वर्षामध्ये योजनेअंतर्गत शिष्यवृत्तीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या ३00 पेक्षा कमी असल्यास भारत सरकार मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या http://mhrd.gov.in/institutions या संकेतस्थळा वरील नमुद (परिशिष्ठ-ब) शैक्षणीक संस्थामधील प्रवेशित मराठा व कुणबी मराठा जातीतील विद्यार्थ्यांनी द्वितीय किंवा पुढील वर्षी या योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती साठी विद्यार्थ्यांनी अर्ज केलेला असल्यास त्यांचे अर्ज योजनेच्या अटी व शर्तीप्रमाणे विचारात घेता येतील.

(३) वरील (१) व (२) प्रमाणे कार्यवाही केल्यानंतर संबंधित निवड वर्षामध्ये शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ३०० पेक्षा कमी असल्यास शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या संस्थांमध्ये महाराष्ट्र राज्यातील प्रवेशित मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा विद्यार्थ्यांचे अर्ज विचारात घेता येतील व त्यांच्या बाबत किमान गुणवत्तेची अट शिथिल करण्यात येईल. मात्र, उर्वरित अटी व शर्ती या कायम राहतील.

(४)या योजनेच्या शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थी अर्ज करेल त्यावर्षी तो पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्गाला (अर्जदार विद्यार्थी डिप्लोमाधारक असेल तर तो पदवीच्या दुसऱ्या वर्गाला) शिकत असला पाहिजे.

(५)या योजनेअंतर्गत संपुर्ण अभ्यासक्रमाच्या कालावधीत विद्यार्थी एक वेळ अनुत्तीर्ण झाल्यास, अनुत्तीर्ण झालेल्या वर्षाची शिष्यवृत्ती त्यास देय ठरणार नाही. परंतु, संबंधित विद्यार्थी उत्तीर्ण झाल्यानंतर त्यास पुढील शिष्यवृत्ती देय ठरेल. तसेच संबंधित विद्यार्थी अभ्यासक्रम कालावधीत दोन वेळा अनुत्तीर्ण झाल्यास पुढील कालावधीची शिष्यवृत्ती देय होणार नाही.

## १५. शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याची पध्दती खालील प्रमाणे असतील :-

या योजनेअंतर्गत शिष्यवृत्तीसाठी या निवेदनासोबत दिलेल्या विहित नमून्यातील अर्ज नमूद विहित कालावधीत समक्ष/पत्राद्वारे व्यवस्थापकीय संचालक सारथी, पुणे येथे सादर करावा.

(अ) शिष्यवृत्ती अर्जासोबत विद्यार्थ्याने पुढील कागदपत्र जोडणे आवश्यक आहे:-

(i) महाराष्ट्राचा रहिवाशी असल्याबाबत अधिवास प्रमाणपत्र,

(ii) विदयार्थी मराठा, कुणबी,मराठा-कुणबी व कुणबी -मराठा जातीचा असल्याचा पुरावा /जातीचा दाखला (सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला)

(iii) फॉर्म नं.१६, उत्पन्नाचा दाखला (सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला) व आयकर विवरण पत्र परिच्छेद (इ) (२) व (३) मध्ये नमूद केल्याप्रमाणे,

(iv) इयत्ता १२ वीचा शाळा/महाविद्यालय सोडल्याचा दाखला,

(v) संस्थेत प्रत्यक्ष प्रवेश मिळाल्याचे संबंधित संस्थेचे पत्र,

(vi) आधार कार्ड, पॅन कार्ड (पालकाचे) व आधार संलग्न बँक खात्याचा तपशिल.

(vii) संपुर्ण गुणपत्रिका, इ.१२वी/डिप्लोमा/पदवी इत्यादी परिक्षांच्या सर्व वर्षाच्या गुणपत्रिका

१६. या योजनेअंतर्गत शिष्यवृत्तीसाठी ३०० पात्र विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास पुन्हा जाहिरातीद्वारे अर्ज मागवुन ३०० विद्यार्थ्यांचा कोटा पुर्ण करण्यात येईल.

१७. या योजनेअंतर्गत शिष्यवृत्तीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्याला इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार नाही. तसेच, विद्यार्थ्याला संबंधित संस्थेत मिळणारे विद्यावेतन, फेलोशिप अन्य कोणतेही लाभ अभ्यासक्रम कालावधीत मिळत असल्यास ते वजा करुन उर्वरित शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येईल.

१८.विहीत केलेल्या विद्यापीठ/संस्थांमध्ये प्रवेशित अभ्याक्रमासाठी अर्ज करताना नमूद केलेला अभ्यासक्रम विहीत कालावधीत पुर्ण करणे विद्यार्थ्यांवर बंधनकारक असेल.

१९.अभ्यासक्रम अर्धवट सोडल्यास शिष्यवृत्तीची संपूर्ण रक्कम संबंधित विद्यार्थी/ पालक/ कुटुंबाकडुन वरील अधिनियमाद्वारे वसूल करण्यात येईल.

२०. विद्यार्थ्याने शिष्यवृती मिळण्यासाठी चुकीची अथवा दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याचे आढळून आल्यास तो फौजदारी गुन्ह्याखाली कारवाईस पात्र ठरेल व त्याला अदा करण्यात आलेली शिष्यवृत्ती महसूली अधिनियमाखाली वसूलपात्र राहील.

२१. या योजनेअंतर्गत निवड केलेल्या विद्यार्थ्यांच्या अंतिम निवडी बाबतचे आदेश सारथीच्या स्तरावरुन निर्गमित करण्यात येतील.

२२. सदर शिष्यवृत्तीच्या बाबत महाराष्ट्र शासनाच्या सारथी संस्थेने घेतलेला निर्णय अंतिम असेल.

२३.शिष्यवृत्तीसाठी निवड प्रक्रिया ही वरील नमूद केलेल्या व वेळोवेळी सुधारणा केलेले पध्दती प्रमाणे होईल.

२४.तसेच विहित नमुन्यातील अर्जाचा नमुना सारथी संस्थेच्या संकेतस्थळावर https://sarthi-maharashtragov.in/ उपल्बध आह. विहितनमुन्यातील अर्ज संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन तो परीपुर्ण भरुन आवश्यक त्या कागदपत्रांसह **सादर करावा.**

२५.तसेच अर्ज विहित नमुन्यामध्ये सादर करणे आवश्यक आहे. अपुर्ण आणि विहित मुदतीनंतर प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

**सदर विषयी भविष्यात कोणतीही माहिती / सूचना उपरोक्त लिंक वरच दिली जाईल. इच्छुक उमेदवारांनी सारथीच्या उपरोक्त संकेतस्थळावर सूचनाफ़लक पहावे.**

For any queries email to : sarthiskvdept@gmail.com

श्री.अशोक काकडे (भा.प्र.से.)
( व्यवस्थापकीय संचालक,सारथी, पुणे)

स्थळ : पुणे

दिनाक : ०७/१०/२०२२

ALL RIGHTS OF CONTENT & FORMAT ON WEBSITE ARE RESERVED WITH SARTHI, PUNE UNAUTHORIZED REPRODUCTION OR DISTRIBUTION OF THIS COPYRIGHTED MATERIAL IS ILLEGAL